म. ग्रं. सं. ठाणें
विषय मै-प्रवास
सं. क्र. ८०

श्रीगजानन छापखान्यांत ...
हें पुस्तक सन १८६७ च्या २५ ...
आक्टाप्रमाणें नोंदलें आहे.

आक्टोबर १०२३ इसवी.

... प्रती १०००.

... ॥ आणे.

REFBK-0002418
REFBK-0002418

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ... ता. ...

# ...ाचा भूगोल शिकविण्यासंबंधीं शिक्षकांस सूचना.

२७१८

**पूर्व तयारी:**—जो विषय आपणास शिकवावयाचा ...ह त्या संबंधीं पूर्ण ज्ञान असल्याशिवाय तो चांगल्या ...ीनें समजावून देतां येणार नाहीं. करितां विषयाची पूर्व तयारी करून नंतर तो शिकविणें बरें.

**संज्ञा व व्याख्या:**—याची माहिती जितकी स्पष्ट करून सांगतां येईल, तितकी सांगावी. शक्य त्या ठिकाणीं प्रत्यक्ष वस्तुदर्शनानें ती गोष्ट मुलांचें मनांत ...बवावी. उठावाच्या नकाशाचा उपयोग करावा. ...क्ष वस्तुदर्शनानें जें ज्ञान अगदीं थोड्या वेळांत ..., तितकें त्याची माहिती बरेच वेळां सांगूनही होत ...ं. माहिती सांगतांना जसजसा संबंध येईल, तसतशा ...ाख्या शिकवीत जाव्या. सर्व व्याख्या आरंभीच ...शिकविण्याचा प्रयत्न करूं नये.

**भूपृष्ट रचना:**— ... ...तांना

REFBK-0002418
REFBK-0002418

नद्यांचे उगम व त्यांचे ओघ, डोंगर व टेकड्…
साह्यानें उंच सखलपणा शिकवावा, आणि उठावाच
नकाशाचा उपयोग करावा.

**स्केलः**—फूट, इंच, यार्ड यावरून मैलांचें ज्ञा
करून द्यावें. कोणत्याही वस्तुची अजमासें लांबी, रुं
ओळखण्याची संवय मुलांना झाली पाहिजे. मैल, को
यांची कल्पना ( परिस्थिती प्रमाणें ) सहलीच्या वे
मुलांस करून द्यावी. या प्रमाणें अंतराचें ज्ञान झाल्य
वर नकाशांतील अंतराची ओळख मुलांना करून द्याव
निरनिराळें स्केल देऊन निरनिराळ्या अंतराच्या रे
मुलांकडून काढून घ्याव्या.

**दिशाः**—पदार्थाचें स्थान बदलल्यानें त्याच
दिशाही बदलतात. ही गोष्ट मुलांच्या नजरेस आण
द्यावी, व त्यावरून मुख्य दिशांची आवश्यकता भासवा
होकायंत्र मिळण्यासारखें असल्यास तें दाखवून त्या
माहिती करून द्यावी, व दिशांचा आणि त्याचा मे
घालून द्यावा.

**नकाशाः**—निरनिराळें स्केल देऊन निरनिरा

...ग्रंथ संग्र...

...ाराखडा ( नकाशा ) मुलांकडून काढून घ्यावा. नंतर शाळेचा व गांवचा नकाशा काढवून घेऊन नंतर तालुक्याच्या नकाशाची ओळख करून द्यावी.

**सीमा व लांबी रुंदी:**—नकाशावरूनच मुलांना ओळखतां आली पाहिजे, व नकाशांतील संक्षिप्त खुणांची माहितीही त्यांना असली पाहिजे.

नद्या, डोंगर, रेल्वे, पक्कया सडका, शाळेची व पोस्टाचीं गांवें, वगैरेंची माहिती त्यांचेकडूनच ( नकाशा वरून ) काढून घ्यावी.

नकाशा व चित्र यांतील फरक समजावून सांगावा.

**आयात व निर्यात माल:**—नेहमीं दृष्टीस पडणारे पदार्थ व उपयोगीं जिनसा यावरून येथें होणारे पदार्थ कोणते? व बाहेरून आलेले पदार्थ कोणते? यांची ओळख करून द्यावी.

**व्यापार:**—गांवांत चालणारा व्यापार व त्याचीं कारणें, यावरून तालुक्यांतील व्यापाराची कल्पना मुलांस आणवून द्यावी.

**प्रसिद्ध स्थळें:**—या बद्दल पूर्ण माहिती सांगून

फळ्यावर किंवा पाटीवर काढलेल्या नकाशांत टेकड्या... कडून भरवून घ्यावी.

सहलः—महिन्यांतून एक दोन वेळां मुलांस बरोबर घेऊन अवश्य फिरावयास जावें. सहल करितांना जमिनीचा उंच सखलपणा, भूगोलांतील संज्ञा, आसपासचीं प्रसिद्ध स्थळें वगैरे संबंधीं जरूर ती माहिती सांगावी, व घरीं आल्यावर पाहिलेल्या गोष्टींचें टांचण करावें.

# चाळिसगांव तालुक्याचा भूगोल.

सरकारी कामाच्या सोईकरितां आसपासचीं पुष्कळशीं गांवें मिळून एक हद्द ठरविलेली असते, त्यास तालुका ह्मणतात. तालुक्यांत सर्वांत मोठें जें गांव असतें त्या गांवचें असणारें नांव त्या तालुक्यास देतात, तेथें त्या हद्दींत असणारें, सर्व गांवचें कामकाज चालतें.

**व्याख्याः**— ( १ ) ज्या ठिकाणीं पुष्कळसे लोक कोणताही धंदा करण्याकरितां घरें दारें बांधून एकत्र राहतात, त्यांच्या त्या वस्तीस **गांव** असें ह्मणतात.

( २ ) गांव मोठा असून त्या ठिकाणीं उद्योग धंदा व व्यापार चांगला चालत असल्यास त्यास **शहर** ह्मणतात.

**टीपः**—शहरांतील मोठमोठ्या रस्त्यास व निरनिराळ्या भागास पेठ, पुरा, मोहल्ला, आळी, गल्ली वगैरे नांवें देतात.

( ३ ) तालुका मोठा असल्यास त्याचा आणखी एक भाग करितात त्यास **पेटा** ह्मणतात.

( ४ ) जमिनीवर जो बराच मोठा उंचवटा असतो त्यास **टेकडी** ह्मणतात.

( ५ ) टेकडीपेक्षां फारच मोठ्या व बऱ्याच लांब-रुंद असणाऱ्या टेकड्यांच्या रांगास **डोंगर** ह्मणतात.

( ६ ) फारच मोठ्या व उंच अशा डोंगरांच्या रांगास **पर्वत** म्हणतात.

( ७ ) ज्या जमिनीचा बराचसा भाग सपाट व मोकळा असतो त्यास **मैदान** म्हणतात.

( ८ ) डोंगरावरील किंवा पर्वतावरील मैदानास **डोंगरसपाटी** किंवा **पठार** म्हणतात,

( ९ ) डोंगराच्या किंवा पर्वताच्या दोन ओळी-मधील खोलगट प्रदेशास **खिंड** किंवा **खोरें** म्हणतात.

( १० ) डोंगरांतून किंवा पर्वतांतून जाण्या येण्या करितां जे रस्ते असतात, त्यास **घाट** असें म्हणतात.

( ११ ) पूर्वी चोर, दरवडेखोर, यांचेपासून त्रास न व्हावा, म्हणून मोठमोठे मातीचे वाडे बांधून त्यांस बुरुज ठेवीत असत, त्या वाड्यास **गढी** म्हणतात.

१२ सभोंवतीं उंच उंच व मजबूत अशा भिंती बांधून आंत मध्यें राहण्याची व लढण्याचीं हत्यारें, शिपाई, वगैरे ठेवण्याची सोय करीत असत. त्यास **किल्ला** ह्मणतात.

१३ डोंगरावरील उंच व अवघड अशा ठिकाणीं बांधिलेल्या किल्ल्यास **डोंगरी किल्ला** ह्मणतात.

१४ जमिनीवर सभोंवतीं खंदक खणून मध्यें बांधिलेल्या किल्ल्यास **भुईकोट किल्ला** ह्मणतात.

१५ एकाद्या नदीचा किंवा नाल्याचा प्रवाह अडविला असतां होणाऱ्या पाण्याच्या सांठ्यास **तळें** किंवा **तलाव** असें ह्मणतात.

**टीपः**—पाण्याचा सांठा लहान असल्यास त्यास तळें आणि मोठा असल्यास त्यास तलाव ह्मणतात.

१६ सर्व बाजुंनीं जमीन असून मध्यें जो पाण्याचा बराच मोठा सांठा असतो त्यास **सरोवर** ह्मणतात.

**टीपः** - सरोवरापासून नद्या निघतात.

१७ सरोवरा पेक्षां फारच मोठ्या व बरेच कोस लांब रुंद असलेल्या अशा खारट पाण्याच्या सांठ्यास **समुद्र** ह्मणतात.

**टीपः**—१ समुद्राच्या पाण्यापासून मीठ तयार होतें. समुद्राचें पाणी खारट असतें. २ सरोवराचें पाणी गोड असतें.

१८ पावसाच्या पाण्यामुळें वाहाणाऱ्या पाण्याच्या अगदीं लहान प्रवाहास **ओहोळ** असें ह्मणतात.

१९ डोंगरांतील अगर एकाद्या उंच जमिनीवरील बरेच ओहोळ एके ठिकाणीं मिळून पाण्याचा जो एक मोठा प्रवाह तयार होतो त्यास **ओढा** किंवा **नाला** असें ह्मणतात.

**टीपः**—या प्रवाहास फार ओढ असते ह्मणून यास **ओढा** असें नांव पडलें.

२० डोंगर किंवा सरोवर या पासून पाण्याचा एकादा प्रवाह निघून बराच लांब पर्यंत वाहात गेलेला असतो, त्यास **नदी** ह्मणतात.

२१ दोन किंवा अधिक नद्या जेथें एकत्र मिळतात त्या ठिकाणास **संगम** असें ह्मणतात.

२२ डोंगरावरून अगर एकाद्या उंच ठिकाणावरून पडणाऱ्या पाण्याच्या प्रवाहास **धबधबा** ह्मणतात.

**टीपः**—उंचावरून खालीं पांणी पडत असल्यानें

धत्र् धत्र् असा आवाज होतो यावरून धत्रधबां असें नांव पडलें.

२३ एकाद्या तलावास किंवा नदीस बंधारा बांधून त्याचा एक फाटा शेतीच्या अगर गांवलोकांच्या उपयोगाकरितां लांबवर नेलेला असतो, त्यास **पाट** असें ह्मणतात.

**टीप**ः—पाट बराच मोठा असून लांब रुंद असल्यास त्यास **कालवा** ह्मणतात.

२४ उतारू व माल चढण्या उतरण्याकरितां आगगाडीस उभें करण्याचें जें ठिकाण त्यास **स्टेशन** असें ह्मणतात.

२५ आगगाडीस जाण्यायेण्याकरितां लोखंडी रुळ टाकून जो एक रस्ता तयार करितात, त्यास **लोखंडी सडक** अगर **रेल्वे** ह्मणतात.

२६ ज्या स्टेशनवर आगगाडीचे दोन किंवा अधिक फाटे एकत्र येऊन मिळतात, त्यास **जंक्शन स्टेशन** ह्मणतात.

२७ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाण्यायेण्याकरितां खडी व मुरूम टाकून जो एक रुंद रस्ता तयार करितात त्यास **पक्की सडक** ह्मणतात.

**टीपः**—सडकेवरून जाणाऱ्या येणाऱ्यांस उन्हापासून त्रास होऊं नये, ह्मणून बहुतेक ठिकाणी सडकेच्या दोन्ही बाजूंस झाडी असते.

२८ पूर्वींच्या राजांनीं सरदार मानकरी वगैरे लोकांस त्यांच्या कामगिरीबद्दल जीं गांवें बक्षीस दिलीं आहेत, त्यास **जहागिरी** ह्मणतात.

२९ ज्या जमिनीस सारा माफ असतो त्यास **इनाम जमिनी** ह्मणतात.

३० जहागिरी ज्याचे ताब्यांत असते त्यास **जहागिरदार** व इनाम जमीन ज्याचे ताब्यांत असते त्यास **इनामदार** ह्मणतात.

३१ जेथून पत्राचें टपाल, पैशाच्या मनिऑर्डरी, पार्सलें वगैरे जातात व येतात त्यास पोस्ट ह्मणतात.

---

## दिशाः—(बाजू)

**मुख्य दिशा चार आहेत**— पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण.

**पोट दिशा चार आहेतः**—ईशान्य, आग्नेय, नैर्ऋत्य, वायव्य.

मराठी ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ता. ... ठाणे.

**दिशांची माहितीः—**

ज्या दिशेस सूर्य उगवतो ती पूर्व व ज्या दिशेस सूर्य मावळतो ती पश्चिम. पूर्वेकडे तोंड केलें असतां आपल्या डाव्या हाताकडे जी दिशा येते, ती उत्तर, व उजव्या हाताकडे जी दिशा येते ती दक्षिण होय.

**टीपः**—पूर्व—पश्चिम, उत्तर—दक्षिण. ह्या दिशा नेहमीं समोरासमोर असतात. कोठें कोठें पूर्व दिशेस उगवत दिशा, व पश्चिम दिशेस मावळत दिशा असें ह्मणतात.

**पोटदिशाः**—उत्तर आणि पूर्व ह्या दिशांमधील कोपऱ्यास ईशान्य दिशा म्हणतात. पूर्व आणि दक्षिण ह्या दिशांमधील कोपऱ्यास आग्नेय दिशा म्हणतात. दक्षिण व पश्चिम ह्यांचेमधील कोपऱ्यास नैर्ऋत्य दिशा म्हणतात. पश्चिम उत्तर ह्यांचे मधील कोपऱ्यास वायव्य दिशा म्हणतात.

दिशा दाखविणारें एक यंत्र असतें, त्यास होकायंत्र म्हणतात. त्यांतील कांटे नेहमी दक्षिण, उत्तर दिशा दाखवितात.

**स्केल:**—मोठी आकृति लहान प्रमाणांत काढतां यावी म्हणून मैलाचें इंचाशीं ठरविलेलें प्रमाण.

**नकाशा:**—मोठ्या जागेची किंवा एक अगर पुष्कळशा गांवांची लहान प्रमाणांत काढलेली आकृति.

**नकाशांच्या दिशा:**—नकाशांतील अक्षरें नीट रितीनें वाचतां येतील असा टांगला असतां त्याची वरची बाजू उत्तर व खालची बाजू दक्षिण. उजव्या हाताकडील बाजू पूर्व. डाव्या हाताकडील बाजू पश्चिम होय.

**नकाशाचे उपयोग:**—१ एकाद्या जागेचा, गांवाचा अगर प्रदेशाचा आकार कसा आहे हें समजतें. २ एका ठिकाणाहून दुसरें ठिकाण किती दूर आहे, कोणत्या दिशेस आहे हें समजतें. ३ टेकड्या, डोंगर, पर्वत वगैरेचीं ठिकाणें, नद्यांचे उगम, वाहण्याची दिशा, तिच्या कांठीं असलेलीं गांवें वगैरेंची माहिती होते.

# [ पूर्व खानदेश जिल्हा. ]

## ( सामान्य वर्णन. )

ज्या जिल्ह्यांत हा तालुका आहे त्यास पूर्व खानदेश जिल्हा म्हणतात.

पूर्वी खानदेश जिल्हा एकच होता, परंतु तो फारच मोठा असल्यामुळें इसवी सन १९०६ पासून त्याचे पूर्व खानदेश व पश्चिम खानदेश असे दोन भाग करण्यांत आले.

पूर्व खानदेशाचें मुख्य ठिकाण जळगांव आणि पश्चिम खानदेशाचें मुख्य ठिकाण धुळें हें आहे. पूर्व खानदेशांत ११ तालुके व दोन पेटे आहेत.

**डोंगरः**—पूर्व खानदेश जिल्ह्याचे उत्तरेस सातपुडा व दक्षिणेस अजिंठा ( सातमाळा ) डोंगर आहे.

**नद्याः**—मुख्य नदी तापी. शिवाय गिरणा, पुर्णा, पांझरा वगैरे.

**जमीनः**—तापी नदीच्या कांठची व चोपडें, यावल, रावेर ह्या तालुक्यांतील जमीन सुपीक आहे.

गिरणा, पूर्णा, पांझरा वगैरे नद्यांच्या कांठची जमीन मध्यम प्रकारची आहे. अजिंठा डोंगर व सातपुड्याच्या उतरणीवरील प्रदेश व टेकड्या ह्यांच्या कांठची जमीन हलक्या प्रकारची आहे.

ह्या जिल्ह्यांत हवामान चांगलें असून कपाशीचें पीक जास्त येत असल्यामुळें व उद्योग धंदा व व्यापार चांगला

चालत असल्यामुळें लोक खाऊन पिऊन सुखी, सुशिक्षीत व उद्योगी आहेत त्यामुळें हा जिल्हा बराच पुढें आला आहे.

## चाळिसगांव तालुका.

### विशेष वर्णन:—

**सीमा:**—पूर्वेस पाचोरें तालुका व निजाम सरकारचा मुलुख. पश्चिमेस नाशिक जिल्हा. उत्तरेस धुळें व पाचोरें तालुके. दक्षिणेस निजाम सरकारचा मुलुख.

**क्षेत्रफळ:**—५२१ चौरस मैल.

**आकार:**—साधारण चौकोना सारखा.

**उंचसखलपणा:**—उत्तरेस दहिंवद, राजमाने, कुंझर, करमड्ड ह्या गांवाजवळ व पुर्वेस चांभार्डी गांवाजवळ लहान लहान टेकड्या आहेत, त्यामुळें व दक्षिणेस सातमाळा डोंगर असल्यामुळें ते भाग उंच आहेत. गिरणा नदीस तालुक्यांतील बहुतेक नद्या मिळत असल्यानें तिच्या कांठचा प्रदेश खोलगट आहे.

**लांबी रुंदी**:— अजमासें दक्षिणोत्तर लांबी २७ मैल. पूर्व पश्चिम रुंदी २३ मैल आहे.

**डोंगर व टेकड्याः**—दक्षिणेस आजिंठा (सातमाळा) डोंगर असून उत्तरेस करमडू, कुंझर, दहिंवद ह्या गांवाजवळ व पूर्वेस चांभार्डी गांवांजवळ लहान लहान टेकडया आहेत.

**डोंगर व टेकड्या यांचा उपयोगः**—सरपण फाटा, व गवत पुष्कळ असल्यामुळें गरीब लोक यावर पोट भरतात. पाऊस जास्त पडतो. नद्या निघतात. गुरें चरण्याची सोय होते.

**नद्याः**—गिरणा, तितूर, डोंगरी, मन्याड, शीव वगैरे.

**गिरणाः**—नाशिक जिल्ह्यांत कळवण तालुक्यांत उगम पावते. व चाळिसगांव, पाचोरें, या तालुक्यातून वाहात जाऊन जळगांव तालुक्यांतील पळसोद गांवाजवळ तापीं नदीस मिळते. हिच्या कांठीं - सायगांव, मांदुर्णें, पिलखोड, उपखेडें, तामसवाडी, वरखेडें, उंबरखेडें, तिरपोळें, मेहुणबारें, दशेगांव, भऊर, वडगांव लांबें, झाळपूर, रहिपूर, जामेंद, बहाळहीं गांवें आहेत.

हिला कोठें कोठें गिरजा असें ही ह्मणतात.

**तितूर**:—अजिंठा डोंगरांत देहेर गांवाजवळ उगम पावून पाचोरें तालुक्यांतील बांबरुड गांवाजवळ गिरणा नदीस मिळते. हिच्या कांठीं गणेशपूर, पिंप्री, चितगांव, निमखेड, तांबोळें, खडकी, चाळिसगांव, टाकळी, ओझर, पातोंडें, वाघळी, हिंगोणें हीं गांवें आहेत.

**डोंगरी**:—ही अजिंठा डोंगरांत पाटणें गांवाजवळील धावरतीर्थापासून उगम पावून चाळिसगांवाजवळ तितूर नदीस मिळते. हिच्या कांठीं—पाटणें, वलठाण, गणपूर, कोतगांव, चाळिसगांव हीं गांवें आहेत.

**मन्याड**: ही नाशिक जिल्ह्यांत उगम पावून ह्या तालुक्याच्या पश्चिम हद्दीवरून वाहात येऊन सायगांवाजवळ गिरणा नदीस मिळतें. हिच्या कांठीं - पिंपळवाड ( निकुंभ ), काकडणें, नांद्रें, सायगांव हीं गांवें आहेत. ही नदी फार खोल असून हिच्या प्रवाहास फार जोर असतो.

**शिव नदी**:—अजिंठा डोंगराच्या पाठीमागच्या बाजूनें सातकुंडाजवळ उगम पावून निजामाच्या राज्यांत गोदावरी नदीस मिळतें. हिच्या कांठीं -हातनूर, अंधानेर, मकणपूर वगैरे गांवें आहेत.

नं. ........
........

**धबधबे**:—अजिंठा डोंगरांत पाटणें गांवाजवळ धावरतीर्थ व केदारकुंड, या नांवाचे दोन धबधबे आहेत. तेथें बऱ्याच उंची वरून पाणी खालीं पडते त्यामुळें तेथें खोल खड्डे पडले आहेत.

**पाट**:—गिरणा नदीस जामदें गांवाजवळ एक भक्कम धरण बांधून त्याच्या दोन्ही बाजुंनीं दोन पाट काढिले आहेत. उत्तरे कडील फाटा २७ मैल लांब असून दक्षिणेकडील फाटा ११ मैल लांब आहे. उत्तरे-कडील फाट्याचे कांठीं जामदें, भवाळी, बहाळ हीं गांवें आहेत. दक्षिणेकडील फाट्याचे कांठीं रहिपूर टेकवाडें वगैरे गांवें आहेत.

तितूर नदीस चाळिसगांवाच्या पूर्वेस अर्ध्या मैलावर एक धरण बांधून तेथून एक पाट टाकळी, ओझर या गांवांवरून पातोंड्या पर्यंत गेला आहे. पण तो हल्लीं नादुरुस्त आहे.

वलठाण गांवाजवळ डोंगरी नदीस रेल्वे कंपनीनें मोठें धरण बांधून एक लहानसा तलाव केला आहे. त्याचें पाणी नळानें स्टेशनवर आणिलें आहे.

तेथें एक टेलिफोन असून त्यांतून चाळिसगांव स्टेशनावरील मनुष्यांशीं चांगलें बोलतां येतें.

**हवापाणी**:—इतर तालुक्यापेक्षां हा तालुका ज्यास्त उंचीवर असून अंजिठा डोंगर जवळ असल्यामुळें पाऊस चांगला पडतो. हवा थंड व निरोगी आहे.

**जमीन**:-घाटावरील जमिनी चांगल्याप्रकारच्या असून त्यांत गहूं, शाळू, हरभरे, कपाशी, करडई वगैरे पिकें चांगलीं होतांत. गिरणा, तितूर, मन्याड वगैरे नद्यांच्या कांठच्या जमिनी मध्यम प्रकारच्या आहेत. त्यांत खत घातल्याशिवाय चांगलें पीक येत नाहीं.

**पिकें**:—पिकाचे मुख्यत: २ प्रकार आहेत १ बागाईत २ जिराईत बागायती पिकें विहीरीच्या व पाटाच्या पाण्यानें तयार करितात. व जिराईत पिकें पावसाच्या पाण्यानें येतात. आपल्याकडे बागायती पिकें पाटाच्या कांठीं असणाऱ्या गांवीं बहुतकरून तयार करितात. बहाळ, पातोंडें, टेकवाडें, वगैरे गांवीं केळीं, संत्रीं, लिंबें, ऊंस, पेरु वगैरेंचे बाग असून पाटाच्या पाण्यानें तीं तयार करितात. इतर ठिकाणीं गहूं, हरभरा वगैरे पिकें, कांदे, मुळे, मिरच्या, वांगीं, करडई, मेथी वगैरे भाज्या विहीरीच्या पाण्यानें तयार करितात.

२४१८



जिराइतापैकीं कपाशी, बाजरी, ज्वारी, तूर, तीळी वगैरे पिकें चांगलीं येतात.

शेतकरी लोक जमिनीच्या मगदुराप्रमाणें वर्षांतून दोन हंगाम करितात. १ पावसाळ्यांत येणाऱ्या पिकांचा. २ हिंवाळ्यांत येणाऱ्या पिकांचा. कपाशी, बाजरी, ज्वारी वगैरे पिकें पावसाळ्यांत येतात, त्यास खरिपाचीं पिकें ह्मणतात. गहूं, हरभरा, करडई वगैरे पिकें हिंवाळ्यांत येतात, त्यास रब्बीचीं पिकें ह्मणतात. हीं पिकें बहुतकरून पाटाच्या व विहिरीच्या पाण्यानें तयार करितात. घाटावरील जमीन चांगल्या प्रकारची असल्यामुळें त्यांत ओलसरपणा जास्त रहातो. ह्या ओलसरपणावरच तिकडे रब्बीचीं पिकें तयार करितात.

**प्राणीः**—आसपासच्या टेकड्यांत हरीण, ससे, कोल्हे वगैरे प्राणी व अजिंठा डोंगरांत चित्ते, रानडुकरें, वाघ वगैरे प्राणी आहेत. शिवाय गाय, बैल, ह्मैस, घोडे, गाढवें, कुत्रीं, मांजरें, बदकें वगैरे पाळींव जनावरें पुष्कळच आहेत.

**खनिज पदार्थः**—दगड व चुना ह्याच्या खाणी पुष्कळ आहेत. बोदे गांवाजवळील एका टेकडीवर

लाल दगडाची एक खाण आहे, तेथें उत्तम प्रकारचे दगड निघतात.

**उद्योगधंदे:**—मुख्य धंदा शेतीचा आहे. त्याचे खालोखाल व्यापार, नौकरी व मजुरी. हे धंदे चांगले चालत असल्यामुळें लोक खाऊन पिऊन सुखी आहेत.

**व्यापार:** - घाटावरील बहुतेक माल औट्राम घाट सडकेनें चाळिसगांवीं येत असल्यामुळें तेथें गहूं, मिरच्या, भुईमुगाच्या शेंगा, तिळी, करडई व तिचें तेल, ढेप, बाजरी, कपाशी वगैरे व्यापार चांगला चालतो. चाळिसगांव, वाघळी, मेहुणबारें, येथें कपाशी लोढण्याचे कारखाने आहेत, त्यांना गिरणी किंवा जीन असें ह्मणतात.

चाळिसगांव येथें एक वर्कशॉप (जीन मध्यें लागणारें सामान तयार करण्याचा कारखाना) असून कपाशीच्या गठ्ठे बांधण्याच्या चार गिरण्या (प्रेस) आहेत, व एक कापडाची गिरणी (मिल्) तयार होत आहे. त्यामुळें मजूर लोकांस भरपूर काम मिळतें.

**वसूल:**—अजमासें २३१००० रु. आहे.

**लोकवस्ती:**—अजमासें १०२५०० इतकी आहे.

ग्रंथ संग्रहालय नं. ठाणे

पैकीं ९२९०० हिंदू असून ७५०० इतके मुसलमान आहेत, बाकीचे इतर आहेत.

ह्या तालुक्यांत वणजारी लोकांची वस्ती जास्त आहे.

टीप:— तालुक्यांतील क्षेत्रफळाचे लोकसंख्येशीं प्रमाण दर चौरस मैलास १९६ असें आहे.

ह्या तालुक्यांत एकंदर १४३ गांवें आहेत. पैकीं ११ गांवें उजाड असून १३२ गांवें लोकवस्तीचीं आहेत, पैकीं १४ गांवें जहागिरीचीं आहेत.

**शिक्षण:**—ह्या तालुक्यांत लहानमोठ्या ४३ सरकारी शाळा असून बऱ्याच खाजगी (गांवठी) शाळाही आहेत. चाळिसगांव येथें मुसलमानी, गुजराथी, मुलांकरितां स्वतंत्र शाळा असून एक इंग्रजी हायस्कूल आहे.

**भाषा:**—मुख्य भाषा मराठी, शिवाय गुजराथी, मारवाडी, इंग्रजी वगैरे भाषा व्यापारी व इतर लोक बोलतात.

**दळण वळणाचीं साधनें:**—तीन प्रकारचीं आहेत. १ रेल्वे, २ पक्क्या सडका. ३ पोष्ट व तारायंत्रें. पूर्वीं ज्या वेळीं आगगाडीचे रस्ते नव्हते, तेव्हां व्यापारी

लोक आपला माल बैल, गाढवें, उंट ह्यांच्या पाठीवर भरून दुसरीकडे पाठवीत होते; परंतु त्यामुळें त्यांना खर्च व वेळ फार लागून चोरांची फार भीति असे. त्यामुळें आपला माल घेऊन, फार लांब कोणी जात नसे. आगगाड्या झाल्यापासून थोड्या वेळांत वाटेल तो माल वाटेल तिकडे सहज नेतां आणतां येतो, व त्रास मुळींच पडत नाहीं, त्यामुळें व्यापार वाढून पुष्कळ सुधारणा झाली आहे.

ह्या तालुक्यांत आगगाडीचे २ रस्ते आहेत. एक मुंबईहून भुसावळकडे गेला आहे, व दुसरा चाळिसगांवाहून धुळ्यास गेला आहे. हे दोन्ही रस्ते चाळिसगांव स्टेशन पासून निघतात. ह्मणून चाळिसगांव हें जंक्शन स्टेशन आहे. मुंबईहून भुसावळकडे जाणाऱ्या रस्त्यावर ह्या तालुक्यांतील रोहिणी, हिरापूर, चाळिसगांव, वाघळी, हीं स्टेशनें आहेत. चाळिसगांवाहून धुळ्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर जामदें व राजमानें, हीं स्टेशनें आहेत.

ह्या तालुक्यांत दोन्ही रस्ते मिळून एकंदर ३७ मैल रेल्वे आहे.

**टीपः**—रेल्वेभाडें दर मैलास चार पै प्रमाणें पडतें.

**पक्क्या सडकाः**— १ चाळिसगांवाहून नांदगांवाकडे. हा रस्ता पूर्वी फार रहदारीचा होता; परंतु रेल्वे झाल्यापासून त्याचा वापर पुष्कळ कमी झाला आहे. हल्लीं तो नादुरुस्त आहे. २ रा चाळिसगांवाहून धुळ्याकडे—ही पक्की सडक असून या रस्त्यानें चांगला वापर आहे. ह्या रस्त्यावर मेहुणबारें, भोरस वगैरे गांवें लागतात. हीच सडक चाळिसगांवापासून पुढें मोंगलाईत औरंगाबादेपर्यंत गेली आहे तिला औट्राम घाट सडक असें ह्मणतात.

३ रा चाळिसगांवाहून मालेगांवास—ही नवीन पक्की सडक तयार केली आहे. हिच्या कांठीं-बिलाखेड, देवळी, पिलखोड वगैरे गांवें आहेत.

४ था चाळिसगांव तें पाचोरें—ही नवीन सडक तयार झाली आहे. हिच्या कांठीं—ओझर, पातोंडें, वाघळी हीं गांवें आहेत.

५ वा चाळिसगांव तें चाळिसगांव स्टेशन.

**टीपः**—स्टेशनकडे जाणारा, धुळ्याकडे जाणारा, व पाचोऱ्याकडे जाणारा हे तिन्ही रस्ते एकाच ठिकाणाहून निघतात.

ह्या तालुक्यांतून दुसरीकडे, जाणारा मालः—कापूस, तिळी, करडई, तेल, सरकी, भुइमूग, इत्यादी ( विशेषतः घाटावरील माल ) ह्या तालुक्यांत दुसरीकडून येणारा मालः—तांदूळ, गहूं, हरभरा, ज्वारी, मीठ, गूळ, साखर, तेल, कापड, भांडीं, लोखंड व बोहऱ्याच्या दुकानीं मिळणारा माल कागद, कांच, पेन्सिला, घड्याळें, चाकू, कातऱ्या इत्यादी.

**राज्यव्यवस्थाः**—गांवची व्यवस्था प्रत्येक गांवांत एक पाटील व एक तलाठी ( कुळकर्णी ) असे दोन कामगार असतात. पाटलाकडे एक मुलकीचें व एक पोलीसीचें अशीं दोन कामें असतात. गांव मोठा असल्यास ह्या प्रत्येक कामाबद्दल एकेक स्वतंत्र पाटील असतो. मुलकीचें काम करणारास मुलकी पाटील व पोलीसीचें काम करणारास पोलीस पाटील म्हणतात.

**मुलकी पाटलाचें कामः**—शेताचा सारा वसूल करणें, व तो कचेरींत भरणा करणें, बांध वरूळ्यांचीं दुरुस्ती करणें व शेती संबंधाचे कागदपत्र मामलेदाराकडे रवाना करणें वगैरे.

**पोलीस पाटलाचें काम:**—गांवांत चोऱ्या, दंगा, धोपा न होऊं देणें. झाल्यास गुन्हेगारास पकडून त्यास तालुक्यांत फौजदारकडे रवाना करणें. जन्म मृत्यूचा तपशील ठेवणें.

तलाठी ( कुळकर्णी )गांवा संबधीं सरकारी माहितीचे कागद तयार करून ते तालुक्यांत रवाना करणें. सरकारी अधिकाऱ्यास लागेल ती माहिती पुरविणें पाटलास सारा वसूल करण्यास मदत करणें वगैरे.

हे मामलेदाराच्या हुकमाप्रप्राणें काम करितात. पाटील कुळकर्णी यांच्या हाताखालीं जागले, महार, भील वगैरे लोक मदतीस असतात.

गांव साधारण मोठा असल्यास त्या गांवांतील ३।४ सभ्य गृहस्थ व पाटील कुळकर्णी यांना गांवचे लोक पंच निवडतात, व त्यांना प्रत्येक घरामागें ठराविक कर देतात. त्या पैशांतून गांवची व्यवस्था राखावयाची असते; त्यास ग्रामपंचायती ह्मणतात. मेहुणबारें, रांजणगांव, वाघळी येथें ग्रामपंचायती आहेत. गांव बराच मोटा असल्यास त्या गांवीं म्युनिसिपालिटी असते त्यांत १५-२० मेंबर ( सभासद ) असतात,

त्यांतील कांहीं गांवांतील लोकांनीं निवडलेले असतात, व कांहीं सरकारनें निवडून दिलेले असतात. ते सर्व एकत्र मिळून प्रत्येक घराच्या मालकाकडून किती पैसा वसूल करावयाचा? व त्यांतून गांवांतील घाण बाहेर टाकणें, पाण्याचा पुरवठा करणें, कंदील लावणें, शिक्षणाची व औषधाची तजविज करणें वगैरे सोयी कशा रितीनें करावयाच्या हें ठरवितात, व त्याप्रमाणें व्यवस्था करितात.

ह्या तालुक्यांत चाळिसगांवीं म्युनिसिपालिटी आहे.

**तालुक्याची व्यवस्थाः**— तालुक्याच्या मुख्य अधिकारास मामलेदार ह्मणतात. ह्यांची कचेरी तालुक्याच्या गांवीं असते. ह्यांच्याकडे तालुक्यांतील सर्व गांवचा सारा वसूल करणें, लहान लहान गुन्ह्यांची चौकशी करणें, तालुक्यांतील सरकारी पैशाची देवघेव करणें, लोकांच्या तक्रारी दूर करणें वगैरे कामें असतात.

गुन्ह्याची चौकशी करते वेळीं मामलेदारास व महालकऱ्यास म्याजिस्ट्रेट असें ह्मणतात. हे जिल्ह्याचे अधिकारी कलेक्टर व भागाचे अधिकारी प्रांत ह्यांच्या हुकुमानें काम चालवितात.

( २३ )

टीपः—३–४ तालुके मिळून एक भाग होतो.

**अव्वल कारकूनः**—मामलेदाराच्या हाताखालीं एक अधिकारी असतो त्यास अव्वल कारकून ह्मणतात. लहान लहान गुन्ह्याची चौकशी करून निकाल देण्याचें काम यांचेकडे असते. जमिनीच्या अगर गुन्ह्याच्या चौकशीकरितां मामलेदारास बाहेरगांवीं फिरावें लागतें. त्यांचेमागें हें काम पाहतात.

तालुक्यांत दंगा, धोपा, मारामारी, चोऱ्या वगैरे होऊं नये व झाल्यास त्यांचा तावडतोब बंदोबस्त व्हावा ह्मणून एक अधिकारी असतो त्यास फौजदार ह्मणतात. त्यांचे हाताखालीं जमादार, हवालदार, नाईक, कान्स्टेबल (शिपाई) हें असतात. फौजदार हे जिल्ह्याचे अधिकारी पोलीस सुपरिन्टेंडेंट व असिस्टंट पोलीस सुपरिन्टेंडेंट ह्याच्या हुकुमानें काम करितात. गुन्ह्याचा तपास लावणें व गुन्हेगारास पकडून म्याजिस्ट्रेटकडे [मामलेदाराकडे] चौकशीकरितां पाठविणें हें ह्यांचें काम आहे. प्रत्येक तालुक्यांत ३–४ ठिकाणीं पोलीस ठाणीं असतात. तेथेंही फौजदार, जमादार, हवालदार वगैरे अधिकारी असतात.

ह्या तालुक्यांत चाळिसगांव, मेहुणबारें, वाघळी, हातनूर ह्या ठिकाणीं पोलीस ठाणीं आहेत. त्यांच्याकडे तालुक्यांतील कांहीं गांवें नेमलेलीं असतात त्या गांवांचा ते बंदोबस्त ठेवितात.

**रजिष्टर कचेरी**:—तालुक्यांतील मुख्य गांवीं शेताचे, घराचे, देवघेवीचे वगैरे कागदपत्र नोंदण्याचें एक ठिकाण असते त्यास रजिष्टर कचेरी ह्मणतात.

ह्या तालुक्यांतील रजिष्टर कचेरी मामलेदार कचेरीच्या पाठीमागें आहे.

**कोर्ट**:—देण्याघेण्यासंबंधाच्या व हक्क वारसासंबंधाच्या तंटयाची चौकशी करण्याच्या ठिकाणास कोर्ट ह्मणतात. यांतील मुख्य अधिकाऱ्यास मुनसफ किंवा सब् जज्ज ह्मणतात.

**फारेष्ट खातें**:—सरकारी जंगलास फारेष्ट ह्मणतात. याचा अधिकारी फारेष्ट रेंजर असतो. त्याचे हाताखालीं हवालदार ( राऊंड गार्ड ), शिपाई ( बीट गार्ड ) वगैरे लोक असतात.

**पब्लिक वर्क्स् खातें**: – सरकारी इमारती, सडका, पाट, नवीन बांधणें व त्यांची दुरुस्ती ठेवणें. हें ह्या

खात्याचें काम आहे. प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं यांचा एक अधिकारी असतो त्यास सब् इंजिनियर ह्मणतात. त्यांच्या देखरेखी खालीं सर्व कामें होतात. यांच्या हाताखालीं ओव्हरशिअर, सब् ओव्हरशिअर, मेस्त्री वगैरे लोक असतात.

**लोकलबोर्ड खातें**:—दरवर्षी शेतकऱ्याजवळून जमिनीच्या साऱ्यावर दर रुपयास एक आणाप्रमाणें कर घेतला जातो, त्यास लोकलफंड ह्मणतात. त्या पैशाची व्यवस्था करणाऱ्या कमिटीस लोकलबोर्ड ह्मणतात. यांतील कांहीं मेंबर (सभासद) सरकारी असतात, व कांहीं लोकांनीं निवडून दिलेले असतात. यांचें काम लोकांच्या उपयोगाकरितां विहिरी, धर्मशाळा, चावड्या वगैरे बांधणें, औषध पाण्याची व्यवस्था करणें, शाळेकरितां खर्च करणें वगैरे आहे.

**पोस्ट ( टपाल खातें )**:—लोकांचीं पत्रें, पैशांच्या मनिआर्डरी देणें घेणें व ज्या त्या ठिकाणीं रवाना करणें. ठेवी ठेवणें हें पोस्टखात्याचें काम आहे. तालुक्याच्या गांवीं सब् पोस्ट मास्तर असतात, व लहान गांवीं ब्रँच पोस्ट मास्तर असतात. पोस्ट ऑफिसाची

तपासणी करण्याकरितां पोस्टाचे इन्स्पेक्टर वगैरे अधिकारी असतात.

चाळिसगांव येथें कचेरीजवळ एक मोठें पोस्ट व तार ऑफिस आहे व स्टेशनवर एक पोस्ट ऑफिस आहे. शिवाय बहाळ, हिरापूर, खेडगांव, मेहुणबारें, वाघळी, पातोंडें, रांजणगांव, पिलखोड, उंबरखेडें, जामदें, सायगांव इत्यादि ठिकाणी लहान लहान पोस्ट ऑफिसें आहेत. पोस्ट लहान असल्यास तें त्या गांवच्या शाळा मास्तराच्या ताब्यांत असतें.

**शाळा खातें:**—ह्या खात्याच्या मुख्य अधिकाऱ्यास एज्युकेशनल इन्स्पेक्टर ह्मणतात. त्यांचे हाताखालीं डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर, सुपरवयिझर वगैरे अधिकारी असतात. ह्यांचीं कामें गांवोंगांव शिक्षणाची सोय करणें, शाळेची परीक्षा घेणें, व तपासणी करणें, शाळामास्तरांच्या शाळेसंबंधीं व इतर गैरसोयी दूर करणे. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं बदल्या करणें वगैरे.

**तालुका मास्तर:** – तालुक्यांतील एकाद्या मोठ्या शाळेंत तालुक्यांतील शाळांचें काम करण्याकरितां एक

मास्तर नेमिलेले असतात. त्यांस तालुका मास्तर ह्मणतात. त्यांचीं कामें —तालुक्यांतील सर्व शाळांचे कागदपत्र डेप्युटीकडे रवाना करणें. डेप्युटीकडून आलेली माहिती तालुक्यांतील शाळा मास्तरास कळविणें, त्यांचे पगार देणें वगैरे. तालुकामास्तरचे हाताखालीं तालुक्यांतील काम करण्याकरितां एक शिपाई असतो त्यास तालुका प्यून ह्मणतात.

**मोठ्या शाळा:**—बहाळ, खेडगांव, मेहुणबारें, पातोंडें, रांजणगांव, उंबरखेडें, वाघळी वगैरे.

या शिवाय इतर ३६ लहान शाळा आहेत.

**बाजार:**—ह्या तालुक्यांत चाळिसगांव मेहुणबारें, वाघळी, सायगांव, खेडगांव, हिरापूर, बहाळ, हातनूर, चापानेर वगैरे ठिकाणीं बाजार भरतात. पैकीं रविवारीं खेडगांवचा, सोमवारीं चापानेरचा, मंगळवारीं हातनूरचा, बुधवारीं वाघळीचा, गुरुवारीं हिरापूर, शुक्रवारीं मेहुणबारें याचा आणि शनिवारीं चाळिसगांवचा. याप्रमाणें बाजार भरतात. त्यांत चाळिसगांव, मेहुणबारें व वाघळी हे मोठे बाजार आहेत. चाळिसगांव व मेहुणबारें येथें गुरांचे बाजार भरतात.

**प्रसिद्ध ठिकाणें:**—चाळिसगांव हें तालुक्याचें ठिकाण असून जंक्शन स्टेशन आहे येथें कोर्ट, कचेरी, तेलाची एक गिरणी आहे व कापडाची एक गिरणी होत आहे. येथें फाल्गुन शुद्ध ११ स गोपालकृष्णाचा रथ निघतो.

**पातोंडें:**—येथें पेरू व बोरें उत्तम होतात.

बहाळ:—येथें संत्र्याचें व केळ्यांचे बाग आहेत.

**उंबरखेडें:**—येथें पागोटीं चांगलीं होतात.

जामदें:—येथें गिरणा नदीस आगगाडी करितां लोखंडी पूल बांधला आहे व येथून २ पाट बऱ्याच लांब अंतरावर नेले आहेत.

**पिलखोड डोण:**—येथें झोरे व सत्रंज्या चांगल्या होतात.

चिखलठाण व हातनूर:—येथें संत्रीं व मोसंबीं यांचे बाग आहेत.

चिखलठाण येथें पूर्वीं द्राक्षाचे मळे होते.

देहेर:—हा पूर्वीं ठाण्याचा गांव होता हल्लीं उजाड आहे. येथें १ डोंगरी किल्ला आहे.

यात्रा:—पाटणें हा उजाड गांव अजिंठा डोंगरांत

आहे. येथें देवीचें प्रसिद्ध देवस्थान असून चैत्री पौर्णिमेस मोठी यात्रा भरते. ती ३ दिवस असते, त्यावेळीं हजारों लोक देवीच्या दर्शनाकरितां फार लांबून येतात. याच गांवाजवळ शृंगारचावडी, नागार्जून, पितळखोरा इत्यादि कोरींव लेणीं आहेत. पितळखोऱ्यांत पूर्वीं चोर व दरवडेखोर लपत असत, व तशा जागाही अद्यापि तेथें आहेत.

**मेहुणबारें**:—शनि आमावास्येस शनीची यात्रा भरते.

**रांजणगांव**:—माघ शुद्ध १५ स खंडेरावाची यात्रा भरते.

**वाघळी**:—पौष शुद्ध १५ स मानभावाच्या देवांची यात्रा भरते.

**सायगांव**:—मार्गशीर्ष शुद्ध १५ स दत्ताची यात्रा भरते.

**राजमानें व करगांव**:—वंजारी लोकांच्या देवाची यात्रा भरते.

**वाकडी**—पौष शुद्ध १५ स मोतोबा नांवाच्या गुरांच्या देवाची यात्रा भरते. याला नवस केला ह्मणजे गुरांचे रोग नाहींसे होतात, अशी समजूत आहे.

**वालझिरी**—हें वाल्मिक ऋषीचें स्थान पिंपरखेडें गांवाजवळ आहे. येथें महादेवाचें एक मंदीर असून उतारू लोकांकरितां एक धर्मशाळा बांधिली आहे. महाशिवरात्रीस येथें यात्रा भरते.

**नागडोह**:—ओझर गांवाजवळ तितूर नदीस एक डोह आहे, येथें एक महादेवाचें मंदीर असून महाशिवरात्रीस यात्रा भरते. येथें राखेसारख्या मातीची (भस्माची) एक खाण आहे, तसली माती दुसरीकडे कोठेंही सांपडत नाहीं.

**बोरखेडें**:—येथें पिराचा उरूस भरतो.

**चाळिसगांव**:—[illegible] ाकाद्री मियाचा उरूस भरतो [illegible] सारखी असते.

REFBK-0002418
REFBK-0002418
दा. क्र.

## श्रीराम लेखन स्टोअर
## चाळीसगांव

येथें सर्व प्रकारचीं शालोपयोगीं पुस्तकें, पाट्या व इतर सर्व प्रकारचा शाळेस लागणारा स्टेशनरी माल फारच किफायत भावानें मिळेल.

☞ ज्यास्त माल घेणारास विशेष सवलत मिळेल.

व्यवस्थापक,

रा० ब० देशपांडे मास्तर,

चाळीसगांव.


